उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी चिंचवड कार्यरत असलेल्या औद्योगीक शिक्षण मंडळ, चिंचवड, पुणे यांच्या मालकीच्या इमारतीच्या थकीत भाडयाच्या रक्कमेस मंजूरी देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांकः एमव्हीडी-०२१६/प्र.क्र.११०/परि-४

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक: १० एप्रिल २०१९

वाचा :

१) **अपर परिवहन आयुक्त यांचे क्र. काजाभा (१४)/०२०९/न. क्र. १/का१०(१)/जा. क्र. १६६९६, दि.७.१२.२०१८ चे पत्र.**

२) **शासन निर्णय समक्रमांक दि.२९.३.२०१६**

प्रस्तावना :

उपप्रादेशिक परिवहन कार्यालय हे औद्योगिक शिक्षण मंडळ, चिंचवड, पुणे यांचे इमारतीमध्ये भाडे तत्वावर कार्यरत होते. सदर इमारतीचे दि.१.४.२००६ ते दि.२१.८.२०१५ या कालावधीचे भाडे रु. १,११,१३,४०३/- तसेच दि.१.९.२०१५ ते ३१.३.२०१६ पर्यंतचे थकीत भाडे रु. १०,६६,१७९/- असे मिळुन रु. १,२१,७९,५८२/- देणे होते. संदर्भाधीन क्र. २ वरील दि.२९.३.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु. १,२१,७९,५८२/- रक्कमेपैकी रु. १,०१,४८,०००/- इतकी रक्कम मंजूर केली हाेती. त्यापैकी प्रत्यक्षात रु. १,००,००,०००/- एवढी रक्कम बीडीएस वर उपलब्ध करुन दिली होती. तद्नंतर अद्यापपर्यंत भाडेपोटी रक्कम दिलेली नाही. दि.१.४.२००६ ते दि.३१.३.२०१६ या कालावधीसाठीचे उर्वरीत भाडे रु. २१,७९,५८२/-, दि.१.४.२०१६ ते दि.३१.१.२०१८ या कालावधीचे रु. २,०२,१०६/-प्रतिमाह याप्रमाणे रु. ४४,४६,३३२/- इतके भाडे (रु. २१,७९,५८२/-+रु. ४४,४६,३३२/-= रु. ६६,२५,९१४/- अधिक सर्व्हीस टॅक्स /जीएसटी असे मिळुन रु. ७३,३३,२८६/- इतकी रक्कम देय करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:-

परिवहन आयुक्त कार्यालयाने संदर्भाधीन क्र. १ वरील दि.७.१२.२०१८ च्या पत्रान्वये सादर केल्यानुसार, औद्योगिक शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड यांच्या मालकीच्या असणाऱ्या व उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड कार्यालय दि.३१.१२.२०१७ पर्यंत कार्यरत असणाऱ्या इमारतीच्या भाडयापोटी रक्कम रु. ७३,३३,२८६/- (रु. त्र्याहत्तर लाख तेहतिस हजार दोनशे शहयाऐंशी फक्त) इतक्या रक्कमेस शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे:-

अ. क्र.	तपशिल	दर	रक्कम (रु.)
१	दि.१.४.२००६ ते ३१.३.२०१६ पर्यंतचे थकीत भाडे (अंशत: प्रलंबित)		२१,७९,५८२/-
२	दि.१.४.२०१६ ते ३१.१.२०१८	२,०२,१०६/-	४४,४६,३३२/-
	+सर्व्हीस टॅक्स@१४.५% (एप्रिल १६ ते मे १६)		५८,६११/-
	+सर्व्हीस टॅक्स@१५% (जून १६ ते जून १७)		३,९४,१०७/-
	+ जीएसटी टॅक्स@१८% (जुलै १७ ते जाने १८)		२,५४,६५४/-
		एकूण रुपये	७३,३३,२८६/-

२. प्रस्तुत बाबींवर होणारा खर्च हा सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षामध्ये "मागणी क्र. बी-३, २०४१ वाहनांवरील कर (०२) प्रादेशिक कार्यालये, (०२) (०१) प्रादेशिक कार्यालये (२०४१ ००३६) (दत्तमत) (अनिर्वाय)१४, भाडेपट्टी व कर" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येईल.

३. वित्तीय अधिकार नियमपुस्तिका, १९७८, दि.१७.४.२०१५ (सुधारीत) मधील वित्तीय नियम भाग-पहिला, उपविभाग-एक मधील अनुक्रमांक १०, नियम क्र. ११५ आणि महाराष्ट्र आकस्मिकता खर्च नियम १९६५ मधील नियम १४७ (क) खालील टिप-१ नुसार प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारानुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०४१०१२०५१८८२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KADAM DATTATRAY HANMANT

Digitally signed by KADAM DATTATRAY HANMANT
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=cf316337e92d3c54da432222208093bfc6ed1d1570f09466351527 3d0b4d27fc, postalCode=400032, street=HOME DEP.MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=a923979cf886d5724fbed87cd57745c3f72eba57b0d277f11e 970f0aaca99802, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KADAM DATTATRAY HANMANT
Date: 2019.04.10 12:10:46 +05'30'

(द. ह. कदम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव

२. मा.मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
३. मा.राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
४. महालेखापाल (लेखापरीक्षक)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
५. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. परिवहन उप आयुक्त (प्रशासन/संगणक/लेखा), परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई
७. प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे
८. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी-चिंचवड, जि. पुणे
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१०.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
११.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१२.अवर सचिव (बीयुडी-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.निवड नस्ती (परिवहन-४)